Estd : 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ५४ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

सोमवार, दि. १९ मार्च, २०१८




## प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के

प्र–कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


यांनी सादर केलेला अहवाल

Estd : 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ५४ वा वार्षिक पदवी प्रदान समारंभ

## सोमवार, दि. १९ मार्च, २०१८

# प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के,

प्र–कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## यांनी सादर केलेला अहवाल

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त समारंभ आज संपन्न होत आहे. या ऐतिहासिक समारंभाचे प्रमुख पाहुणे पद्मश्री ए. एस. किरण कुमार, उपस्थित मान्यवर, खासदार, आमदार, महापौर, नगरसेवक, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, नूतन पदवीधर, विद्यार्थी व विद्यार्थिनी, पालक, माध्यम प्रतिनिधी आणि मित्र हो, आजच्या दीक्षान्त सोहळ्यामध्ये मा. कुलगुरू तसेच सर्व अधिकार मंडळांच्या वतीने, मी आपणा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करतो.

तसेच, नूतन पदवी प्राप्त स्नातकांचेही सुरवातीलाच मनापासून अभिनंदन करतो. या दीक्षान्त समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रांची संख्या ही ५०,४४४ इतकी असल्याचे सांगताना मला आनंद होतो आहे.

मित्र हो, शिवाजी विद्यापीठ हे छत्रपती शिवाजी महाराज या थोर युगकर्त्याच्या नावाने सुरु झालेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाला थोर समाजसुधारक व स्त्री शिक्षणाचे प्रणेते महात्मा फुले, सामाजिक न्याय प्रत्यक्ष अंमलात आणणारे राजर्षि छत्रपती शाहू महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर या सर्वांच्या विचारांचा वारसा लाभला आहे. छत्रपती राजाराम महाराज आणि डॉ.बाळकृष्ण यांचे कोल्हापुरात विद्यापीठ व्हावे, असे स्वप्न होते. हे स्वप्न साकार करण्यासाठी कै. मा. यशवंतराव चव्हाण व लोकनेते बाळासाहेब देसाई, डॉ. सी. रा. तावडे आणि या परिसरातील अनेक मान्यवरांनी प्रयत्न केले. विद्यापीठ स्थापनेनंतर प्रथम कुलगुरु मा. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी या

विद्यापीठाच्या उभारणीत अथक परिश्रम घेतले, याची विनम्र आठवण मला होते आहे. या सर्वांच्या पवित्र स्मृतींना मी मनापासून अभिवादन करतो.

मित्र हो, सुवर्णमहोत्सवी शिवाजी विद्यापीठाने ३.१६ सीजीपीए गुणांकनासह 'नॅक'ची 'अ' श्रेणी प्राप्त करण्याबरोबरच गेल्या दोन वर्षांत राष्ट्रीय 'एनआयआरएफ' क्रमवारीत २८वा क्रमांक, 'यू.एस. न्यूज अॅन्ड वर्ल्ड रिपोर्ट' या अमेरिकेतील प्रतिष्ठित संस्थेने भारतातील 'बेस्ट ग्लोबल युनिव्हर्सिटीज'च्या यादीत २१ वे स्थान, अग्रगण्य 'नेचर' संशोधन पत्रिकेच्या सर्वेक्षणानुसार, ऑनलाइन संदर्भांचा व्यापक वापर करणाऱ्या विद्यापीठांच्या यादीत दुसरे स्थान असे अनेक प्रतिष्ठेचे सन्मान प्राप्त केले आहेत.

नुकत्याच २५ फेब्रुवारी २०१८ रोजी प्रसिद्ध झालेल्या 'करन्ट सायन्स' या अग्रमानांकित जर्नलमधील माहितीनुसार, संशोधनाच्या संदर्भात शिवाजी विद्यापीठाने देशात आठवा तर देशातील अकृषी विद्यापीठांमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे, हे सांगताना मला आनंद होतो आहे.

भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी देशातील वीस शैक्षणिक संस्था आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बनविण्याची आणि त्यासाठी विविध सुविधांसह एक हजार कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा गतवर्षी केली. मला या ठिकाणी सांगण्यास अत्यंत आनंद होतो आहे की, त्या दृष्टीने केंद्र सरकारने ज्या ३२ शैक्षणिक संस्थांची यादी तयार केली आहे, त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाचाही समावेश करण्यात आला आहे. गेल्या दोन–तीन वर्षांत आपण संशोधनासह सर्वच बाबतीत जी कामगिरी बजावली आहे, त्या कामगिरीला मिळालेली ही पोचपावती आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोल्हापूर, सातारा, आणि सांगली या तीन जिल्ह्यांमध्ये विस्तारले असून संलग्नित महाविद्यालयांची संख्या २८१ आहे. शिवाय १३ संशोधन संस्था विद्यापीठाशी संलग्नित आहेत. यापैकी १४ महाविद्यालयांना नॅकचे 'अ' आणि तीन महाविद्यालयांना 'अ+' मानांकन प्राप्त झाले आहे. दोन संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा मिळाला आहे. त्यामुळे एकूण स्वायत्त महाविद्यालयांची संख्या आठ झाली आहे. ही विद्यापीठाचा लौकिक वाढविणारी बाब आहे.

विद्यापीठात ३९ पदव्युत्तर अधिविभाग आहेत. सुमारे अडीच ते पावणेतीन लाख विद्यार्थ्यांना चार विविध विद्याशाखांतून पदवी आणि पदव्युत्तर उच्च शिक्षण आणि संशोधन स्तरावरील शिक्षण दिले जाते. याबरोबरच काम करुन शिकणारे, शिक्षणाच्या नियमित प्रवाहात काही कारणाने येऊ न शकणारे असे सुमारे ४० हजार विद्यार्थी दूरशिक्षण घेत आहेत.

विद्यापीठाच्या विकासासाठी, संशोधन कार्यात विविध अधिविभागातील प्राध्यापक सतत प्रयत्नशील असल्याने संशोधन व विकासासाठी भारतातील विविध वित्तीय शिखर संस्थांकडून विद्यापीठास या वर्षात आजपर्यंत सुमारे २ कोटी ४७ लाख ९८ हजार ७७४ रुपये इतका निधी प्राप्त झाला आहे. राष्ट्रीय स्तरावरील संशोधनात शिवाजी विद्यापीठाचा 'एच' इंडेक्स ८६ इतका असून त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचे मानांकन देशात उंचावले आहे.

विद्यापीठाच्या जीव-रसायनशास्त्र विभागामध्ये राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत (रुसा) प्रस्थापित करण्यात आलेल्या 'रुसा सेंटर फॉर नॅचरल प्रोडक्ट्स अॅन्ड अल्टरनेटिव्ह मेडिसीन' या केंद्राचे 'ई-लॉन्चिंग' तथा उद्घाटन केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री मा. श्री. प्रकाश जावडेकर यांनी १७ एप्रिल २०१७ रोजी केले. त्याचप्रमाणे या विभागाने गेली १५ वर्षे अथकपणे मधुमेहाच्या संदर्भात जे संशोधन केले आहे, त्याच्या औद्योगिक उत्पादनासाठी विद्यापीठाने सामंजस्य करारही केला आहे. या संशोधनामुळे मधुमेह अगदी प्राथमिक टप्प्यावरच ओळखून त्यावर उपचार करता येणार आहेत. विशेष म्हणजे ही पद्धती पूर्णतः आयुर्वेदीक आहे.

विद्यापीठाच्या नॅनो-सायन्स व तंत्रज्ञान विभागाची अत्यंत चांगली प्रगती सुरू आहे. अल्पावधीतच या विभागाचे विद्यार्थी दक्षिण कोरियासह तैवान, जर्मनी, युके आदी देशांत संशोधन व उच्चशिक्षण यासाठी रवाना झाले आहेत. शिवाय, आठ विद्यार्थी स्प्रिंजर-नेचर या वैज्ञानिक प्रकाशनगृहात विज्ञान-लेखक म्हणून रुजू झाले आहेत. नॅनो-सायन्स विभागाच्या कु. नीलम यादव या बी.एस्सी. टी.वाय. मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीला फ्रान्सची प्रतिष्ठेची इरॅस्मस-मुंडस स्कॉलरशीपही मिळाली आहे.

संशोधन वाढीस लागण्यासाठी आणि संशोधनाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठाने गेल्या वर्षभरात म्यॉंगजी विद्यापीठ (दक्षिण कोरिया), पोर्ट्समाऊथ विद्यापीठ (युके), वॉलन्गॉंग विद्यापीठ (ऑस्ट्रेलिया), एरियल विद्यापीठ (इस्राईल), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी (गोवा), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ (मुंबई), जमनालाल बजाज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (मुंबई), क्रिक-हिल, इंडोजर्मन टूल रुम (आयजीटीआर), इन्फोसिस आदी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व औद्योगिक संस्थांबरोबर सामंजस्य करार केले आहेत.

इंडो-जर्मन टूल रुमशी झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत विद्यापीठात 'अॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी सेंटर'ची स्थापना करण्यात आली आहे. विद्यापीठ या केंद्राच्या माध्यमातून कौशल्याधारित प्रशिक्षण, समाजोपयोगी संशोधन व मनुष्यबळ विकास अशा प्रशिक्षण- संशोधन-विकास या तीन घटकांवर भरीव काम करणार आहे. या अंतर्गत चालविण्यात येणारे अभ्यासक्रम दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांपासून ते त्यावरील कोणत्याही अर्हताधारकाला अगदी अल्प शुल्कात करता येणार आहेत, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

त्याचप्रमाणे केंद्र सरकारच्या 'टेक्निकल एज्युकेशन क्वालिटी इम्प्रूव्हमेंट प्रोग्राम' अर्थात 'टेक्विप' प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यात **(TEQIP-III)** शिवाजी विद्यापीठाची मार्गदर्शक संस्था (मेंटॉर) म्हणून नियुक्ती करण्यात आली असून हिमाचल प्रदेशातील कांग्रा येथील राजीव गांधी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची सल्लागार संस्था म्हणून विद्यापीठ काम पाहील. त्याचबरोबर ईशान्य भारतातील राज्यांसाठीही मार्गदर्शक म्हणून काम पाहील.

इन्फोसिस समवेत झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत इन्फोसिसच्या बेंगलोर येथील मुख्यालयात विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतील ५० शिक्षकांच्या पहिल्या बॅचला प्रशिक्षण

देण्यात आले. तसेच, 'ट्रेन द ट्रेनर्स' प्रशिक्षणाचा दुसरा टप्पा विद्यापीठात झाला. यातही सुमारे ४५ शिक्षकांनी सक्रिय सहभाग दर्शविला. यापुढेही हा उपक्रम सुरू राहण्याच्या दृष्टीने अधिक विस्तृत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

मला या ठिकाणी आपणा सर्वांना एक गोष्ट सांगताना विशेष आनंद होतो आहे की, केंद्र सरकारतर्फे घोषित करण्यात आलेल्या 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ ॲकेडेमिक नेटवर्क्स' (GIAN-ग्यान) या योजनेअंतर्गत अमेरिका, दक्षिण कोरिया, थायलंड, इटली आणि फ्रान्स या देशांतील विविध विषयांतील तज्ज्ञांनी आपल्या विद्यापीठात येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रकल्पातून विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक बंध दृढ होण्यास मदत होते आहे. आपले विद्यापीठ आता जागतिक स्तरावर पोहोचत आहे, याचेच हे लक्षण आहे.

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागात सुरू करण्यात आलेल्या दोन महत्त्वाच्या अभ्यासक्रमांची माहिती मला येथे द्यावीशी वाटते. या विभागात 'रेशीमशेती प्रकल्प अभ्यासक्रम' सुरू करण्यात आला आहे, ज्यात अगदी सातवी उत्तीर्ण शेतकऱ्याला सुद्धा प्रवेश घेता येतो. तसेच, एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांसाठी रेशीमशेतीविषयक 'ॲड–ऑन' अभ्यासक्रमही सुरू केला आहे, जेणे करून विद्यार्थ्यांत रोजगार क्षमता वृद्धी होईल.

विद्यापीठाचा पर्यावरण शास्त्र विभाग सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सातत्याने सार्वजनिक जीवनात कार्यरत आहे. त्यामध्ये गणेशमूर्ती दान उपक्रम, ध्वनीप्रदूषण पातळी मापन, हवा–आर्द्रता मापन, पंचगंगा प्रदूषण सर्वेक्षण आदी उपक्रमांचा समावेश आहे. त्याचबरोबर कोल्हापूरकरांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असलेला किरणोत्सव अत्यंत यशस्वीपणे संपन्न होण्यामध्येही या विभागाने निरीक्षणे नोंदवून केलेल्या सूचना अत्यंत उपयुक्त ठरल्या, याचा मला अभिमानपूर्वक निर्देश करावासा वाटतो.

विज्ञान अधिविभागांबरोबरच सामाजिक शास्त्रे व भाषा विषयांची कामगिरीही स्तुत्य स्वरुपाची आहे. हिंदी विषयात कौशल्याधारित अभ्यासक्रम सुरू करणारे शिवाजी विद्यापीठ पहिले आहे. भाषा विषयांचे ज्ञान घेऊन त्या आधारेही उत्तम करिअर करता येऊ शकते, याची प्रचिती या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून येते आहे. विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागानेही महिला सरपंचांसाठी दोन दिवसीय विशेष कार्यशाळा तसेच मराठी विकीपिडिया संपादन कार्यशाळा या दोन अत्यंत कालोचित कार्यशाळांचे आयोजन केले.

'युनिसेफ'ने राज्यातील विद्यापीठांच्या वित्त व लेखा कार्यपद्धतीचा सहा महिन्यांहून अधिक काळ अभ्यास करून एकमेव शिवाजी विद्यापीठास अनुदानास पात्र ठरविले, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. 'युनिसेफ पार्टनरशीप विथ शिवाजी युनिव्हर्सिटी फॉर मीडिया ॲन्ड कम्युनिकेशन ॲक्टिव्हिटीज' या उपक्रमासाठी विद्यापीठास दिलेल्या दहा लाख रुपयांच्या निधीतून 'बालहक्कांच्या संदर्भात माध्यमांची भूमिका' या विषयावर अत्यंत महत्त्वपूर्ण कार्यशाळा घेण्यात आली.

यंदा बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रात 'रिसोर्स सेंटर फॉर इन्क्लुजिव्ह एज्युकेशन' कार्यान्वित करण्यात आले. त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली. माजी कुलगुरू प्राचार्य

डॉ. रा. कृ. कणबरकर यांच्या कुटुंबियांनी ४००० ग्रंथ विद्यापीठ ग्रंथालयास भेट म्हणून दिले. तर ग्रंथालयानेही मातोश्री वृद्धाश्रमातील ग्रंथालयासाठी त्यांच्या मागणीनुसार २६८ ग्रंथ भेट दिले.

मित्र हो, गेल्या वर्षात विद्यापीठ कॅम्पसवरील कन्झ्युमर स्टोअरमध्ये आमुलाग्र बदल करण्यात आला असून नवे मॉलसदृश आधुनिक रुप धारण केले आहे.

ऐतिहासिक ऑक्सफर्ड विद्यापीठास 'व्हिजिटिंग स्कॉलर' म्हणून भेट देण्याची संधी विद्यमान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना प्राप्त झाली. पदारुढ कुलगुरूंना अशी संधी फार क्वचित मिळत असते, ती मा. कुलपती महोदयांमुळे त्यांना प्राप्त झाली. त्याचप्रमाणे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच सध्या मुंबई विद्यापीठ, मुंबई या अत्यंत महत्त्वाच्या अशा विद्यापीठांचे प्रभारी कुलगुरूपद भूषविण्याची संधीही शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंना लाभली.

बेल्जियमचे शाही दांपत्य नोव्हेंबर २०१७ मध्ये भारत भेटीवर आले होते. त्यावेळी राणी मॅथिल्ड यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे 'अॅकॅडेमिक राऊंड टेबल' परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी देशभरातून केवळ शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंना उपस्थित राहण्याचे आमंत्रण प्राप्त झाले. इतकेच नव्हे, तर राणीसाहेबांचे स्वागत करण्याचा बहुमानही देण्यात आला.

गतवर्षी घोषित केल्याप्रमाणे विद्यापीठ मोबाईल अॅप, पेमेंट गेटवे व एम्प्लॉईज कॉर्नर या सुविधा कार्यान्वित झाल्या आहेतच, पण रोखविरहित आर्थिक व्यवहारांना चालना देण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाला बळकटी देण्याच्या अनुषंगाने विद्यापीठाने कॅश विभागात 'पॉईंट ऑफ सेल' अर्थात पी.ओ.एस. मशीन्स बसविली आहेत. विद्यापीठाचे सर्व आर्थिक व्यवहार पूर्णतः रोखविरहित स्वरुपात करण्यास चालना दिली असून यंदा दीक्षान्त शुल्क ऑनलाइन भरणा करण्याची प्रणाली शंभर टक्के यशस्वी झाली आहे.

अधिविभागांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या सेमिनार, कार्यशाळा यांची नोंदणी करणे, नोंदणी फी पेमेंट गेट-वे द्वारा ऑनलाइन स्वीकारणे, कार्यशाळा प्रमाणपत्र डिजीटल स्वरुपात उपलब्ध करून देणे ही सर्व कामे ऑनलाइन पद्धतीनेच होत आहेत. विद्यापीठात अत्यंत यशस्वीपणे पार पडलेल्या अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ युवा महोत्सव तथा 'शिवोत्सव-२०१७' आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'आव्हान-२०१७' या उपक्रमांसाठीची नोंदणी, आवश्यक माहितीची देवाण-घेवाण आणि प्रमाणपत्र उपलब्धता आदी बाबीही ऑनलाइन अॅन्ड्रॉईड अॅप्लीकेशनच्या माध्यमातून यशस्वीपणे करण्यात आल्या.

विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या बैठकांचे कामकाज कागदविरहित होण्याच्या दृष्टीने ऑनलाइन सॉफ्टवेअरची चाचणी यशस्वी झाली असून वित्त व लेखा विभागाच्या अखत्यारीतील सर्व बैठकांचे कामकाज पेपरलेस पद्धतीने सुरू झाले आहे. इतर सर्व बैठकांचे कामकाजही टप्प्याटप्प्याने ऑनलाईन करण्यात येणार आहे.

मित्र हो, सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून आपण राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबवितो. त्याअंतर्गत यंदाही आपण 'स्वच्छ भारत' उपक्रमांतर्गत, शिवाजी विद्यापीठ परिसरासह रंकाळा तलाव परिसर, श्री महालक्ष्मी मंदिर, शहरातील विविध पुतळ्यांचा परिसर, मध्यवर्ती बस स्थानक आणि छत्रपती शाहू महाराज रेल्वे स्टेशन यांच्या परिसरांची स्वच्छता केली.

यंदा राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबीर- 'आव्हान-२०१७'चे विद्यापीठात यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले. शिबीरात १४ विद्यापीठांचे ४२ प्रशिक्षक कार्यक्रम अधिकारी, ३६ कार्यक्रम अधिकारी, ३७६ विद्यार्थिनींसह एकूण ११७३ विद्यार्थी सहभागी झाले. त्यांना एन.डी.आर.एफ च्या जवानांनी प्रशिक्षण दिले.

विद्यार्थी विकास विभागाच्या माध्यमातून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सव तथा 'शिवोत्सव-२०१७' चे अत्यंत नेटके व यशस्वी संयोजन करण्यात आले. अलीकडेच झालेल्या राज्यस्तरीय युवा महोत्सवात विद्यापीठाच्या कव्वाली टीमने प्रथमच आपली मोहोर उमटवली. सकाळ माध्यम समूहाच्या साथीने 'ऊर्जा-संवाद ध्येय वेड्यांशी', दैनिक महाराष्ट्र टाइम्स व कणेरी मठाच्या सहकार्याने 'योगशक्ती-योगयज्ञ', 'एनजीओ कम्पॅशन २४', सामूहिक राष्ट्रगीत गायन, रक्तदान शिबीरे, एकता दौड आदी उपक्रमांचे यशस्वी आयोजन केले.

पारंपरिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये प्रदान करण्यासाठी विद्यापीठात 'सेंटर फॉर स्कील अॅन्ड आंत्रप्रिन्युअरशिप डेव्हलपमेंट'तर्फे विद्यापीठ कॅम्पसवर तसेच महाविद्यालयांतून कौशल्य विकास उपक्रम राबविण्यात आले. 'स्कील ऑन व्हील्स' या उपक्रमांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील विविध गावांत जाऊन तेथील नागरिकांना, युवकांना त्यांना हवे त्या कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात आले. केवळ विद्यापीठातीलच नव्हे, तर अगदी पदवीपूर्व शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही कॅम्पसवर जॉब फेअरचे आयोजन करण्यात येते आहे. त्यातून शेकडो विद्यार्थ्यांना रोजगार संधीही उपलब्ध होत आहेत.

'स्वच्छ भारत', 'जलयुक्त शिवार', 'कौशल्य विकास', 'डिजीटल इंडिया' आदी शासकीय उपक्रमांच्या प्रसारासाठी तसेच विविध शासकीय योजनांच्या राबवणुकीसाठी एनएसएस, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग यांच्या माध्यमातून काही गावे दत्तक घेऊन तेथे ग्रामीण विकासाचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

परीक्षा विभागाने प्रश्नपत्रिकांच्या वितरणासाठी एस.आर.पी.डी. अर्थात 'सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलिव्हरी' या 'ई-मोड' प्रणालीचा अवलंब करून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका व्यवस्थितपणे वितरित केल्या. आता याची व्याप्ती वाढवून आणखी काही नव्या अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला असून ही प्रक्रिया अत्यंत सुरळितपणे सुरू आहे. त्याचप्रमाणे कॉम्प्युटर सायन्स व आय.टी. शाखांमधील २४ विषयांची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरित्या घेण्यात येत आहेत.पथदर्शी प्रकल्पांतर्गत बी. फार्मसी. व एम.फार्मसी. या अभ्यासक्रमांच्या मूल्यांकित उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग व मागणीप्रमाणे विद्यार्थ्यांना ई-मोड स्वरुपात उपलब्ध करून देण्याचा प्रयोग यशस्वी झाला आहे.

'डिजीटल इंडिया' उपक्रमांतर्गत पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रे व इतर शैक्षणिक कागदपत्रे संगणकीय स्वरुपात साठवणे व हाताळण्याचा उपक्रम राष्ट्रीय स्तरावर सी.डी.एस.एल. या संस्थेने हाती घेतला आहे. आपण त्यांच्याशी सामंजस्य करार केला असून त्याअंतर्गत प्राथमिक टप्प्यात ५२ हजार विद्यार्थ्यांचा डेटा त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. गेल्या दीक्षान्त समारंभापासून विद्यार्थ्यांना पत्राऐवजी एसएमएस तसेच ऑनलाइन स्वरुपात सूचना देण्यात येत आहेत. त्यामुळे खर्चात मोठी बचत झाली आहे.

परीक्षा विभागाने यंदाच्या हिवाळी सत्रापासून परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या हजेरीचा अहवाल कनिष्ठ पर्यवेक्षकाकडून ऑनलाइन भरून घेऊन तत्काळ विद्यार्थ्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर लघुसंदेश पाठविला जातो. यामुळे विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेवर नजरचुकीने घातलेल्या चुकीच्या बैठक क्रमांकाची माहिती लगेच प्राप्त होते, शिवाय, ई–मार्कशीट अंतिम करताना अडचण येणार नाही. प्रायोगिक तत्त्वावर फार्मसीच्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेच्या फोटोकॉपी पीडीएफ स्वरुपात त्यांच्या ई–मेल आयडीवर पाठविल्या जातील.

मित्र हो, येत्या शैक्षणिक वर्षापासून 'चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम' अर्थात सीबीसीएस पद्धती सर्व पदवी अभ्यासक्रमांना लागू करण्यात येणार आहे. सीबीसीएस अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे 'ओपन इलेक्टीव्ह कोर्सेस'चे मॅन्युअल तयार करून ते विद्यापीठाच्या वेबसाइटवर उपलब्ध केले आहे. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी आणि त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी समस्त शिक्षकांनी प्रयत्नरत व्हावे, असे आवाहन या प्रसंगी मी आपणा सर्वांना करू इच्छितो.

शिवाजी विद्यापीठाच्या ५४ व्या दीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री ए. एस. किरण कुमार उपस्थित आहेत. त्यांचा परिचय करून देत असताना मला अत्यंत आनंद होत आहे. अलुरू सेलिन किरण कुमार यांचा जन्म २२ ऑक्टोबर १९५२ रोजी कर्नाटकातील हसन जिल्ह्यातील एका सामान्य कुटुंबात झाला. १९७१ साली त्यांनी नॅशनल कॉलेज ऑफ बेंगलोर युनिव्हर्सिटीमधून भौतिकशास्त्र विषयात पदवी प्राप्त केली. १९७३ साली त्याच विद्यापीठातून त्यांनी इलेक्ट्रॉनिक विषयात एम.एस्सी. ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. १९७५ साली त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगलोर येथे फिजीकल इंजिनिअरिंग या विषयातून एम. टेक. ही पदवी प्राप्त केली. १९७५ साली त्यांनी अहमदाबाद येथील अवकाश संशोधन केंद्रातून आपल्या संशोधनात्मक कारकीर्दीस प्रारंभ केला.

मा. किरण कुमार यांनी भारतीय अवकाश संशोधन कार्यात महत्त्वाचे योगदान दिले आहे. चांद्रयान–१ आणि मंगळयान या दोन अवकाशयानांचे महत्त्वाचे वैज्ञानिक भाग विकसित करण्यात त्यांचे मोठे श्रेय आहे. २०१४ साली त्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानातील योगदानाबद्दल भारताचा चौथा सर्वोच्च नागरी 'पद्मश्री' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

किरण कुमार यांचे अवकाश संशोधनावरील विविध लेख व व्याख्याने सर्वश्रुत आहेत. भारतीय अवकाश संशोधनातील योगदानामुळे त्यांनी ओळख सर्वदूर निर्माण झाली. भास्कर टीव्ही,

चांद्रयान–१ आणि मंगळयान यांच्या निर्मितीमध्ये आणि ते विकसित करण्यामध्ये १९७९ साली वापरण्यात आलेले 'इलेक्ट्रो–ऑप्टीकल इमेज सेन्सर' हे भारतातील पहिले रिमोट सेन्सिंग सॅटेलाइट होते. तसेच, त्यांनी निर्माण केलेले 'ओशन कलर' हे उपकरण हवामानाचा अंदाज वर्तविण्यासाठी, समुद्री अंतर व भूप्रदेश मोजण्यासाठी आणि संदोशवहनाच्या कामी महत्त्वपूर्ण ठरले. इन्सॅट थ्री–डी, मायक्रो सॅटेलाइट आणि कार्टोसॅट यांची निर्मिती आणि विकसनामध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रतिमा उपकरणाच्या निर्मितीमध्ये देखील त्यांचे बहुमोल योगदान आहे.

चांद्रयान–१ प्रकल्पातील मॅपिंग कॅमेरा व हायड्रोस्पेक्ट्रल इमेजर निर्मितीमध्ये मा. किरण कुमार यांच्या नेतृत्वाखालील टीमने देदीप्यमान कामगिरी बजावली आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

मित्र हो, आपण सर्वजण पदवीधर, पदव्युत्तर आणि संशोधनातील पदवी घेऊन एका नव्या जगात, नव्या युगात प्रवेश करणार आहात. हे नवे जग वेगवान आणि स्पर्धेचे आहे. ही स्पर्धा जागतिक स्तरावरची आहे. त्यासाठी तुम्हाला या पदवीबरोबरच काही महत्त्वाची जीवनकौशल्ये आणि तंत्रकौशल्ये आत्मसात करावी लागणार आहेत. ज्यामुळे तुमचा पुढील कार्यकाळ सुखद आणि आशादायी होण्यास मदत होणार आहे. आपली अंगभूत कौशल्ये, आत्मविश्वास आणि सृजनशीलतेच्या बळावर जगातील जवळजवळ सर्व देशांत शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी प्रशंसनीय कामगिरी करीत आहेत. विद्यापीठाच्या लौकिकात आपणही मोलाची भर घालणार आहात, याची मला खात्री आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, लोकराजा राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बापूजी साळुंखे यांच्या वैचारिक वारशाची सतत जाणीव ठेवून उद्याची देदीप्यमान शिखरे सर करण्यासाठी आपण सारे सज्ज व्हावे, हाच संदेश याप्रसंगी आपणांस देऊ इच्छितो.

अखेरीस आपणा नव स्नातकांचे पुनश्च: एकदा अभिनंदन करतो आणि आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा व्यक्त करतो.

जय हिंद! जय महाराष्ट्र!!

□□□

प्रकाशक : कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४.

मुद्रक : अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर-४१६ ००४